**प्रेसनोट दि.०३/०३/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर**

## बँकेची फसवणुक करणाऱ्या आरोपींना कोर्टाचा दणका

आरोपी नामे श्री निवास मोहन हुबळीकर,वय-२७ वर्षे,धंदा -व्यवसाय,रा.कृष्णाई प्लॉट क्र.२०, स.नं. १४२, विश्वशांती कॉलनी, पिंपळे सौदागर,पुणे याने दि.१९/१/२०१४ रोजी फिर्यादी यांच्या स्टेट बँक ऑफ हैद्राबाद,शाखा सिंहगड रोड,पुणे येथे पार्क स्ट्रीट, रूबी एमराल्ड डायमंड को.ऑप.हौसींग सोसायटी,लि. मधील रो हाऊस नंबर बी-४,वाकड, पुणे हा बंगला खरेदी करण्यासाठी गृहकर्जाचे कारण देऊन ॲग्रीमेंट टु सेलची व इतर बनावट कागदपत्रे देऊन एकुण १,०८,००,०००/-रू. (एक कोटी आठ लाख रूपये) चे गृहकर्ज दि.८/३/२०१४ रोजी मिळवुन त्याची परतफेड न करता बँकेची फसवणुक केलेली होती म्हणुन श्रीमती श्रृंखला अमित जैन, तत्का.शाखा व्यवस्थापक - स्टेट बँक ऑफ हैद्राबाद,शाखा-सिंहगड रोड,पुणे यांनी फिर्याद दिल्याने दत्तवाडी पो.ठाणे गु.र.नं. ३०२/२०१६ भा.द.वि.क.४१७,४२०,४६५,४६७,४७१,१२०(ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्हयाचा तपास दत्तवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर सलगर यांच्याकडे सोपविण्यात आला.

गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपी श्री निवास मोहन हुबळीकर याला पुढे करुन त्याची कागदपत्रे वापरुन गणेश राजेश वाघेरे पिंपरी, पुणे व सागर गोरखनाथ नढे काळेवाडी, पिंपरी पुणे यांनी मुख्य गुन्हा केला असल्याचे तपासावरुन निष्पन्न झाले म्हणुन त्यांना आरोपी करण्यात आलेले होते. सदर आरोपी पैकी आरोपी श्री निवास हुबळीकर व गणेश वाघेरे यांना अटक करण्यात आलेली असून सध्या ते येरवडा कारागृहात आहेत. तर आरोपी सागर गोरखनाथ नढे हा फरार होता. वरील आरोपींनी मा. सत्र न्यायालय, शिवाजीनगर पुणे येथे जामीन व अटकपूर्व जामीन मिळण्या करीता अर्ज केला असता दत्तवाडी पोलीसांनी त्यास तिव्र विरोध केल्याने आरोपींचा जामीन मंजूर झाला नाही. त्यानंतर आरोपी गणेश वाघेरे व सागर नढे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला असता सदर ठिकाणीही सदर आरोपीच्या जामीनास तपास अधिकारी सपोनि शंकर सलगर, दत्तवाडी पोलीस स्टेशन यांनी तीव्र हरकत घेतली. त्यामुळे अटोकाट प्रयत्न करूनही वरील पैकी कोणत्याही आरोपीला जामीन मंजूर न झाल्याने गुन्हयातील संपूर्ण अपहारीत १ कोटी ०८ लाख रुपयाची रक्कम आरोपींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे डिमांड ड्राफ्ट द्वारे भरलेली आहे. सदर गुन्हयाचा उत्त्कृष्ठ तपास करून तीनही आरोपी विरूध्द मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. कोर्ट नं. ०२, शिवाजीनगर पुणे येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यामुळे फसवणुक करणा-या आरोपींचे धाबे दणाणले आहेत.

सदर गुन्हयाचा तपास मा. श्री मंगेश शिंदे - पोलीस उप-आयुक्त सो.,परिमंडळ — ३, श्री.बाजीराव मोहिते-सहा. पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, श्री.देवीदास घेवारे-वरिष्ठ पोलीस निरीक्षक,दत्तवाडी पो.ठाणे,श्री. राजेंद्र सहाणे-पोलीस निरीक्षक (गुन्हे),दत्तवाडी पो.ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक शंकर सलगर, दत्तवाडी पोलीस ठाणेहे करीत आहेत.

(देवीदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो स्टे, पुणे शहर